# Frequently Asked Questions

## CONTENTS


❖ द्राक्ष उत्पादनाचे अर्थशास्त्र व वित्तपुरवठा

❖ द्राक्षबाग लागवड विचार

❖ द्राक्ष बागायतदारांच्या समस्या व त्यावरील शंका समाधान

[Back to Contents](#)

## ❖ द्राक्ष उत्पादनाचे अर्थशास्त्र व वित्तपुरवठा

१. खर्च व उत्पादन यांचा विचार करता द्राक्ष लागवड खरोखरच फायदेशीर होते का?

२. निर्यातीसाठी द्राक्ष उत्पादन घेण्यास कितपत वाव आहे?

---

**१. खर्च व उत्पादन यांचा विचार करता द्राक्ष लागवड खरोखरच फायदेशीर होते का?**

**उत्तर -** कोणत्याही प्रकारच्या शेतीव्यवसायाकडे उद्योग या दृष्टीकोनातून पाहिले व त्याप्रमाणे नियोजन केले तर शेती नक्कीच फायदेशीर होईल. द्राक्षबागेचा उभारणीचा खर्च तसेच उत्पादन खर्च निश्चित जास्त आहे. परंतु आपण चांगल्या प्रतीचा माल तयार केला तर त्यास चांगली बाजारपेठ मिळून फायदा होण्यात काही अडचण येणार नाही.

Back

---

**२. निर्यातीसाठी द्राक्ष उत्पादन घेण्यास कितपत वाव आहे?**

**उत्तर -** भारतामधून द्राक्षनिर्यातीस भरपूर वाव आहे. निर्यातक्षम द्राक्ष उत्पादन घेऊन आपण प्रति एकर क्षेत्रातून अधिकाधिक फायदा मिळवू शकतो. त्याचप्रमाणे देशात मोठ्याप्रमाणावर परकीय चलन प्राप्त होईल.

Back

[Back to Contents](#)

## ❖ विषय - द्राक्षबाग लागवड विचार

१. द्राक्षबाग लागवडीची सर्वंकष माहीती मिळविण्यासाठी काही प्रशिक्षण उपलब्ध आहे काय ?

२. कोणत्या प्रकारची लागवड योग्य ठरेल ?

३. द्राक्ष लागवड खुंटांवरच करणे आवश्यक आहे का ?

४. पूर्ण खडकाळ जमीन द्राक्ष लागवडीखाली आणणे शक्य होईल का ?

५. उंच सखल जमीन समपातळीत न आणता लागवडीसाठी वापरता येईल का ?

६. द्राक्षलागवडीच्या ओळींची दिशा कशी असावी ? प्लॉट पूर्व पश्चिम लांबीचा असल्यास काय करावे ?

७. रेड ग्लोबची लागवड करावी का ?

८. द्राक्ष लागवडीसाठी चर घेणे आवश्यक आहे काय ?

### १. द्राक्षबाग लागवडीची सर्वंकष माहीती मिळविण्यासाठी काही प्रशिक्षण उपलब्ध आहे काय ?

**उत्तर -** द्राक्षबाग लागवडीसंदर्भात वेगवेगळ्या विषयांवर आधारीत प्रशिक्षण कार्यक्रम राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, पुणे येथे राबविले जातात. त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागाईतदार संघ, पुणे यांचेतर्फे जुलै-ऑगस्ट महिन्यात एक विस्तृत अभ्यासक्रम प्रशिक्षणानावे घेतला जातो. वेळोवेळी होणा-या सेमिनार व फिल्ड व्हिजीट्सव्दारे लागवडी संदर्भात प्रशिक्षण दिले जाते. या संदर्भात राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, पुणे यांनी काही पुस्तिका देखिल प्रकाशित केलेल्या आहेत. त्यांचा आपण जरुर लाभ घ्यावा. अधिक माहितीकरता येथे क्लिक करा.

Back

### २. कोणत्या प्रकारची लागवड योग्य ठरेल ?

**उत्तर -** द्राक्षाचे प्रकारानुसार खाण्याची, बेदाण्याची व वाईनची अशी ढोबळ विभागणी करता येते यामध्ये आपल्या क्षेत्राच्या मर्यादा व पिकांचे अर्थशास्त्र व त्या पदार्थासाठी बाजारपेठेतील मागणी लक्षात घेऊन निवड करावी व त्याप्रमाणे नियोजन करावे.

Back

**३. द्राक्ष लागवड खुंटांवरच करणे आवश्यक आहे का ?**

**उत्तर -** पूर्वी पाणी व जमीनीची संबंधीत क्षारता व दुष्काळ अशा समस्या मोठया प्रमाणावर भेडसावत नव्हत्या. परंतु दिवसेंदिवस पाण्याची उपलब्धता व त्याची प्रत खालावत चालली आहे. अशा परिस्थितीमध्ये द्राक्षवेलीच्या वाढीवर एकूण उत्पादनावर दुष्परिणाम होत आहेत. यावर खुंटांचा वापर हा चांगला उपाय सापडला आहे व योग्य खुंटांचा वापर करून द्राक्ष बागा यशस्वी होत आहेत.

Back

**४. पूर्ण खडकाळ जमीन द्राक्ष लागवडीखाली आणणे शक्य होईल का ?**

**उत्तर -** चर काढून किंवा ४ ते ५ फूट खोलवर रिपींग करून जमीन भुसभुशीत केल्यानंतर खडकाळ जमीनदेखील द्राक्ष लागवडीसाठी आणता येते.

Back

**५. उंच सखल जमीन समपातळीत न आणता लागवडीसाठी वापरता येईल का ?**

**उत्तर -** जमीन समपातळीत आणणे हे लागवडीनंतर बागेत करावयाच्या यांत्रिकीकरणास योग्य ठरते परंतु समपातळीत आणणे अगदीच शक्य नसल्यास कंटूर प्रकारे लागवड करावी. याठिकाणी ओळींच्या

दिशांसंदर्भात कोणतेही नियम पाळणे शक्य होणार नसले तरी वळण पद्धतीचा अशाप्रकारे वापर करावा की जेणेकरून वेलीच्या सर्व वाढीस सारखा सुर्यप्रकाश मिळेल व पाण्याची उपलब्धता राहील असे पहावे.

Back

**६. द्राक्षलागवडीच्या ओळींची दिशा कशी असावी ? प्लॉट पूर्व पश्‍चिम लांबीचा असल्यास काय करावे ?**

**उत्तर -** सुर्यप्रकाशचा पुरेपूर उपयोग होण्यासाठी ओलांडयाची रचना उत्तर-दक्षिण राहणे आवश्यक असते. त्यामुळे ‘T’ किंवा ‘Y' पद्धतीत ओळींची दिशा उत्तर-दक्षिण ठेवावी. मंडप पद्धतीत कोणत्याही दिशेने लागवड करून ओलांडयाला वळण देणे शक्य होते.

Back

**७. रेड ग्लोबची लागवड करावी का ?**

**उत्तर -** रेड ग्लोब या बियांच्या द्राक्षाची लागवड अलीकडे प्रायोगिक तत्वावर केली आहे. या जातीस संजीवकाचा वापर करण्याची आवश्यकता पडत नाही. तसेच थिनींग करावे लागत नाही. मण्यांचा आकार मोठा व आकर्षक चव असल्याने या जातीस निर्यातीस वाव आहे.

Back

**८. द्राक्ष लागवडीसाठी चर घेणे आवश्यक आहे काय ?**

**उत्तर -** लागवडीपूर्वी चर घेऊन त्यात शेणखत, काडी कचरा माती भरल्याने मुळांच्या वाढीचे कार्यक्षेत्र भुसभुशीत राहते. त्यामुळे वेलीची सुरुवातीची वाढ चांगली होऊन लवकर उत्पादनक्षम बनते. ५ फूट खोलपर्यंतची माती मोकळी करण्यासाठी 'रिपींग' हे तंत्रज्ञान वापरणे देखील आवश्यक आहे.

Back

Back to Contents

## ❖ द्राक्ष बागायतदारांच्या समस्या व त्यावरील शंका समाधान

द्राक्षबागेत सध्याची परिस्थिती म्हणजे, नविन बाग, खरड छाटणी घेतलेली जुनी बाग व खुंटरोपांची लागवड केलेली बाग होय. अशा या परिस्थितीमध्ये काही ठिकाणी पोषक असे वातावरण आहे तर काही ठिकाणी अडचणी आढळून येतात. या संदर्भात बागायतदारांना येणाऱ्या समस्या व त्यावर शंकासमाधान खालील प्रश्न व उत्तराच्या रूपात दिले आहे.


1. बागेत पाने पिवळी पडायला लागलीत ती कशामुळे व त्यावर उपाययोजना कशा असाव्यात?
2. पाऊस नसल्यामुळे घडनिर्मितीवर काही परिणाम होतील काय?
3. वेलीवर काडीच्या तळावरील तसेच मध्यभागची काही पाने सुकत आहेत यावर उपाय काय असावा?
4. नविन बागेत जुलै महिन्यात संजीवकांचा वापर किती करावा?
5. काडी लवकर परिपक्व होत आहे अशा परिस्थितीत फळ छाटणीपूर्वी काही वाईट परिणाम होतील काय?
6. खुंटरोपाचा रिकट घेण्यास उशीर झाला, जुलै महिन्यात घेता येईल काय?
7. द्राक्षबागेत पानगळ कशामुळे होऊ शकते व त्यावर उपाय योजना काय कराव्यात?
8. नविन फुट जास्त निघत असल्यास काय करावे?
9. बागेत काडी परिपक्व झाली हे कसे समजावे? काडी परिपक्व होण्याकरिता कोणत्या उपाययोजना कराव्यात?


### १. बागेत पाने पिवळी पडायला लागलीत ती कशामुळे व त्यावर उपाययोजना कशा असाव्यात?

**उत्तर** - द्राक्षबागेत पाने पिवळी पडण्याची कारणे म्हणजे जुने झालेले पान, रोगग्रस्त पान व तसेच वेलीवर असलेली दाट कॅनॉपी बागेत पाण्याचा ताण असल्यानंतर सुध्दा पाने पिवळी पडू शकतात.तेव्हा दाट कॅनॉपी सुरुवातीच्या काळात कमी करणे, पाण्याचा ताण पडू न देणे व रोगांचा प्रादूर्भाव होणार नाही याकरिता फवारणी करणे, इत्यादी उपाय योजना कराव्यात.

Back

### २. पाऊस नसल्यामुळे घडनिर्मितीवर काही परिणाम होतील काय?

**उत्तर** - काडीमधील डोळ्यांमध्ये घडनिर्मितीचा कालावधी निघून गेला व आता काडीच्या परिपक्वतेचा कालावधी सुरू आहे त्यामुळे विपरीत परिणाम होणार नाही.

Back

### ३. वेलीवर काडीच्या तळावरील तसेच मध्यभागची काही पाने सुकत आहेत यावर उपाय काय असावा?

**उत्तर -** मुळांचा विकास जरी पुर्ण झाला असेल तरी पण जमिनीचा प्रकार, वेलीला कमी मिळालेले अन्नद्रव्य व पाण्याचा ताण या गोष्टींमुळे कदाचित मुळांची कार्य करण्याची क्षमता कुमकुवत होते व त्यामुळेच मुळे पाहिजे तेवढी कार्यक्षम राहात नाही. त्याचाच परिणाम म्हणून कधीकधी वरची जुनी झालेली पाने सुकताना आढळतात. ही परिस्थिती उन्हाळ्यामध्ये अनुभवास येते. वेलीला कुठल्याही प्रकारचा ताण बसणार नाही याची काळजी घ्यावी. त्याचप्रमाणे मुळाच्या भोवती कार्बेंडाझीमचे कमी प्रमाणात पाण्यात द्रावण करून टाकल्यास मुळांची कार्य करण्याची क्षमता वाढते.

Back

### ४. नविन बागेत जुलै महिन्यात संजीवकांचा वापर किती करावा?

**उत्तर -** नविन बागेत ओलांडा तयार करणे व त्यावर काड्यांची संख्या वाढवणे ही प्रक्रिया फळ छाटणीपर्यंत सुरूच ठेवता येते. परंतु, फळ छाटणीच्या वेळी आपण ओलांड्यावर असलेल्या हिरव्या काड्या काढून टाकतो, कारण या काड्यावरील डोळ्यांमध्ये घड तयार झाला तरी तो मजबूत नसतो व छाटणी केल्यानंतर या घडाचे गोळी घडात किंवा बाळीमध्ये रूपांतर झालेले दिसते. तेव्हा जुलै महिन्यात काड्या वाढवण्याचा प्रयत्न उपयोगाचा नसतो. म्हणजेच या काळात नविन बागेत संजीवकांचा वापर गरजेचा नसतो.

Back

### ५. काडी लवकर परिपक्व होत आहे अशा परिस्थितीत फळ छाटणीपूर्वी काही वाईट परिणाम होतील काय?

**उत्तर -** पाण्याची कमतरता व त्याचसोबत बागेत असलेले कोरडे वातावरण यामुळे नविन फुटी निघणे बंद झालेत. अशा या परिस्थितीत पाने लवकर जुनी झाल्याचा अनुभव येतो. ही पाने लवकर गळुन पडण्याची व नंतर नविन फुट निघण्याची संभावना सुध्दा जास्त राहील. जर वेलीवर फुटीची जास्त गर्दी असल्यास रोगांचा प्रादुर्भाव सुध्दा लवकर होतो व पानगळ होते .ही परिस्थिती निर्माण होणार नाही या करीता वेलीला पाण्याचा ताण पडणार नाही या करिता याची काळजी घ्यावी. या नंतर १० ते १२ दिवसाच्या अंतराने बोर्डो मिश्रणाची (१०%) फवारणी करावी. यामुळे पानांच्या देठांची काडीशी असलेली पक्कड मजबुत होईल व भविष्यात लवकर होणारी पानगळ टाळता येईल.

Back

### ६. खुंटरोपाचा रिकट घेण्यास उशीर झाला, जुलै महिन्यात घेता येईल काय?

**उत्तर -** खुंटरोपाचा रिकट घेण्याची वेळ निघून गेलेली आहे. रिकट घेतल्यानंतर जर जोरात पाऊस आल्यास फुटी निघण्यास विलंब होईल व निघालेल्या फुटी अशक्त राहतील. कलम करते वेळी आपल्याला आवश्यक असलेली 8 मिमी ची जाडी मिळणार नाही. तेव्हा आता रिकट न घेता फक्त 2 - 3 फुटी ठेऊन बाकीच्या फुटी काढून टाकल्यास या फुटी जाड करून घेता येतील.

Back

### ७. द्राक्षबागेत पानगळ कशामुळे होऊ शकते व त्यावर उपाय योजना काय कराव्यात?

**उत्तर -** द्राक्षबागेत पानगळ होण्याकरिता बऱ्याच गोष्टी जबाबदार असतात. सर्वात महत्वाचे म्हणजे वेलीवर रोगांचे जिवाणू हे पानामधून रस शोषून घेतात व त्यामूळे पानं अशक्त होते व पाने गळायला सुरूवात होते. बागेत जर दाट कॅनॉपी असेल तर प्रत्येक पान सुर्यप्रकाशाच्या सान्निध्यात येणार नाही. खालची पाने सुर्यप्रकाशाच्या अभावामुळे पिवळी पडून गळून पडतील.

जमिनीत चूनखडी असल्यास तसेच पाण्यातील क्षार द्राक्षवेल उचलते व त्याचा परिणाम हा पानांवर दिसून येतो. अशा परिस्थितीमध्ये सुध्दा पानांची गळ शक्य आहे.

यावर उपाययोजना म्हणजे वेलीला पाण्याचा ताण पडनार नाही याची काळजी घेणे, रोगांचा प्रसार नियंत्रणात ठेवणे व कॅनॉपी सुटसुटीत ठेवणे, इ. गोष्टी महत्वाच्या असतात.

Back

---

### ८. नविन फुट जास्त निघत असल्यास काय करावे?

**उत्तर -** पाऊस व जास्त आर्द्रतेच्या वातावरणात नविन फुट जास्त निघतांना दिसते. अशावेळी ही फुट थांबवणे जास्त गरजेचे असते, जर ही फुट थांबवली नाही तर अनावश्यक वाढणाऱ्या या फूटीमधील अन्नद्रव्य वाया जाईल. तेव्हा फुटीचे पिंचींग करने (शेंडा मारणे), बागेत पाणी कमी करणे, वाढ नियंत्रकाची जास्त मात्रा घेऊन (750 ते 1000 पि पि एम) फवारणी करणे, इ. गोष्टी यावेळी महत्त्वाच्या राहतील.

Back

---

### ९. बागेत काडी परिपक्व झाली हे कसे समजावे ? काडी परिपक्व होण्याकरिता कोणत्या उपाययोजना कराव्यात?

**उत्तर -** खरड छाटणीच्या 60 दिवसानंतर काडी परिपक्व व्हायला सुरूवात होऊन 61 ते 90 दिवसात काडी परिपक्व होते. काडी परिपक्व होणे म्हणजे काडीच्या तळाकडून हिरव्या रंगाचे रूपांतर दूधाळ पांढऱ्या रंगात होते व त्याचसोबत शेंडावाढ थांबते.

जर शेंडावाढ जास्त होत असल्यास काडी परिपक्व होण्यास विलंब लागेल. तेव्हा शेंडा पिंचीग करून, वेलीला पालाश या खताची पूर्तता करावी व वेलीला पाणी कमी प्रमाणात द्यावे म्हणजे हे साधून घेता येईल.

**Back to Contents**